

# मेट्रोतून थेट सिद्धिविनायकाच्या चरणी!

**मुंबईमध्ये लोकांच्या दारापर्यंत मेट्रो रेल्वे पोहोचवून आता अपुऱ्या भासणाऱ्या मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवेला पूरक ठरणारी सार्वत्रिक जलद वाहतूक प्रणाली बनण्याचा मेट्रो रेल्वेचा प्रयत्न आहे. मुंबई मेट्रो - ३ प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रहदारीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येईल. प्रकल्पामुळे सुमारे १६ लाख रेल्वे प्रवाशांना वातानुकूलित डब्यातून प्रवास करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे प्रवासाच्या वेळेत घट, ध्वनी व हवेच्या प्रदूषणात घट, सुरक्षित व आरामदायी प्रवास अशा अनेक सोयीसुविधा उपलब्ध होतील. संपूर्णपणे भुयारी असणाऱ्या मेट्रो मार्गावर २७ स्थानके असतील. हा मार्ग मुंबईतील ६ महत्त्वपूर्ण व्यावसायिक केंद्रांशी, ३० शैक्षणिक संस्था, ३० मनोरंजनाची ठिकाणे तसेच स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ इत्यादींशी जोडणी उपलब्ध करून देईल. पाच स्थानके उपनगरीय रेल्वेशी अदलाबदल करण्यासाठी असतील; ज्यामध्ये एक मोनोरेलसाठी व एक वर्सोवा - अंधेरी - घाटकोपर मेट्रो - १ साठी असेल.**




**सचिन लुंगसे**

(लेखक हे लोकमत मुंबई आवृत्तीत वरिष्ठ प्रतिनिधी आहेत)


खडकाला फोडत पुढे जाणाऱ्या टनेल बोरिंग मशीनने प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराखालून जाणाऱ्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ चे भुयार केव्हाच पूर्ण केले आहे आणि आता तर येथील सिद्धिविनायक मंदिर मेट्रो स्थानकाचे जवळपास ७० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामही वेगाने पूर्ण करण्याकडे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा कल असणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सिद्धिविनायक मेट्रो स्थानकात उतरणाऱ्या प्रवाशांना स्थानकातून थेट मंदिरात प्रवेश करत सिद्धिविनायकाचे दर्शन घेता येणार आहे; आणि हेच या स्थानकाचे वैशिष्ट्य आहे.

मुंबई इन मिनिट्स हे स्वप्न साकार करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन ही दोन प्राधिकरणे वेगाने काम करत असली तरी जगाचे लक्ष भुयारी मेट्रो - ३ कडे आहे. कारण भुयारी मेट्रो - ३ ची आरे येथील प्रस्तावित कारशेड वादात सापडल्यानंतर कांजुरमार्गचा पर्याय पुढे आला होता. आता तर कांजुरमार्ग येथील कारशेडचा प्रश्नही निकाली निघालेला नाही; मात्र भुयारी मेट्रो - ३ चे काम वेगाने सुरू असून, कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मार्गातील फोर्ट, सिद्धिविनायक, विमानतळ ही प्रमुख स्थानके जगाचे लक्ष वेधत आहेत. त्यातल्या त्यात सिद्धिविनायक हे देवस्थान असल्याने फोर्ट आणि विमानतळासोबत सिद्धिविनायक मेट्रो स्थानक सर्वाधिक गर्दीचे स्थानक असेल, असा दावा प्राधिकरणांनी केला आहे.

आजघडीला सिद्धिविनायक मेट्रो स्थानकात सुमारे पाचशेहून अधिक कामगार कष्ट करत आहेत. कोरोनाकाळात गावाकडे स्थलांतरित झालेले कामगार आता पुन्हा प्रकल्पस्थळी दाखल झाले आहेत. त्यामुळे कामाला पुन्हा पहिल्यासारखा वेग आला आहे. दिवसाचे २४ तास येथील कामगार सिद्धिविनायक मेट्रो स्थानकाचे स्वप्न साकार करण्यासाठी झटत आहेत. यात कुशल कामगारांसह अभियंते आणि इतर कामगारांचा भरणा असून, कामगारांवर ताण येऊ नये म्हणून पाळ्यांमध्ये येथील काम केले जात आहे. कामगारांसाठी नाष्टा, जेवण आणि मनोरंजनाची व्यवस्था आहे. राहण्यासाठी कॅम्प आहेत. जेवण शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पद्धतीचे आहे. मनोरंजन म्हणून खेळाचे पर्याय दिले जात आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोरोना काळात कामगारांच्या आरोग्याला प्राधान्य दिले जात असून, लसीकरणासही स्थान देण्यात आले आहे.

सिद्धिविनायक मेट्रो स्थानकाचे काम सिद्धिविनायक मंदिरालगतच सुरू आहे. भुयाराचे काम जवळपास पूर्ण झाले असून, पूर्ण झालेल्या भुयारातून आता सिस्टीम वर्क सुरू करण्यात आले आहे. सिस्टीम वर्कअंतर्गत दिवाबत्ती, ट्रॅकसारख्या तांत्रिक कामांचा समावेश आहे. अप आणि डाऊन अशा दोन्ही भुयारांना सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सुरक्षा दरवाजे ठेवण्यात आले आहेत. जेणेकरून एखाद्या भुयारी मार्गात आपत्कालीन घटना घडली तर याच दरवाजातून लगतच्या भुयारातील मेट्रोमध्ये प्रवाशांना सुरक्षित नेता येईल. याव्यतिरिक्त प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून येथे काम सुरू असतानाच आजमितीस २५ मीटर खोल जमिनीत तीन स्तरावर स्थानक विभागण्यात आले आहे. सर्वात खालच्या भागात भुयार आणि मेट्रो स्थानक आहे. त्यावरील भागात मेट्रो स्थानकाचे तिकीट काऊंटर आणि इतर बाबी आहेत. त्यावरील भागात कमर्शियल किंवा त्याच्याशी निगडित घटक आहेत आणि त्यावरील भागात म्हणजे जमिनीवर स्थानकाचे काम पूर्ण झाल्यावर मैदान/उद्यान असणार आहे. म्हणजे जेव्हा केव्हा स्थानकाचे काम पूर्ण होईल तेव्हा पूर्वीप्रमाणे येथील परिसर निदर्शनास येईल.

सिद्धिविनायक मेट्रो स्थानकासाठी एकूण सात प्रवेशद्वारे असणार आहेत. यातील प्रमुख एक रवींद्र नाट्य मंदिरालगत असून, दुसरे प्रमुख प्रवेशद्वार थेट सिद्धिविनायक मंदिरात असणार आहे. म्हणजे सिद्धिविनायक मेट्रो स्थानकात उतरणाऱ्या प्रवाशांना स्थानकातून थेट मंदिरात प्रवेश करता येणार आहे. मुळात सिद्धिविनायकाचे दर्शन घेण्यासाठी भक्तगण मेट्रोचा अधिकाधिक वापर करतील, असा आशावाद प्राधिकरणाला आहे. दरम्यान, भुयारी मेट्रो - ३ मार्ग प्रत्यक्षात आकारास येण्यास आणखी चार वर्षे लागतील, असा अंदाज बांधला जात असतानाच मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मात्र यावर तूर्तास बोलणे टाळले आहे; मात्र प्रकल्पाची डेडलाइन सातत्याने वाढत असल्याने प्रकल्प खर्चातही वाढ होत आहे, परंतु जेव्हा केव्हा हा प्रकल्प प्रत्यक्षात साकार होईल आणि मुंबई मेट्रोचे जाळे एकमेकांशी जुळेल तेव्हा मुंबई सुपरफास्ट वेगाने धावू लागेल.